महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २० जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३५२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आपल्या शिवसेनेचा मेळावा बाळासाहेबांच्या प्रखर हिंदुत्ववादी विचारांचा – एकनाथ शिंदेंची गर्जना!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**आपला मेळावा हा बाळासाहेबांच्या विचारांचा आहे. तर दुसरा मेळावा हा सत्तेसाठी लाचार झालेल्यांचा आहे असे म्हणत सुरुवातीलाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटावर हल्लाबोल केला. हिंदुत्वाचा भगवा आपल्याकडे आहे. शिवधनुष्य आपल्याकडे आहे आणि जनतेचा आशिर्वाद देखील आपल्याकडे आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. आपल्या पक्षात जी वाढ होतेय ही सर्वांच्या मेहनीची आहे. 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण याचेच हे प्रतिबिंब असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.**

**मुंबई :** जुलै २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत स्वतःची शिवसेना स्थापन केली. त्यावेळेपासून दोन शिवसेना महाराष्ट्रात अस्तित्वात आल्या असून दोन्ही शिवसेना एकमेकांविरोधात उभ्या ठाकल्या आहेत. राज्यात दोन शिवसेना निर्माण झाल्यानंतर यंदाचा वर्धापनदिन साजरा झाला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही शिवसेनेचे मेळावे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा वर्धापनदिन वरळीतील डोम येथे, तर ठाकरेंच्या शिवसेनेचा वर्धापनदिन षण्मुखानंद




सभागृहात पार पडला.

या मेळाव्यात; बाळासाहेबांनी आयुष्यभर ज्या काँग्रेसचा विरोध केला. मात्र या लोकांनी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधण्याचे काम केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. महाराष्ट्राचा विश्वासघात केल्याची टीका एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर केली. मुख्यमंत्रीपदासाठी झाले लाचार ते काय होणार बाळासाहेबांचे वारसदार असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी थेट उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. सत्तेच्या खुर्चीसाठी कधीही आम्ही तडजोड करणार नाही असे एकनाथ शिंदे म्हणाले. हिंदुत्वाची आम्ही कधी प्रतारणा करणार नाही वचन आम्ही दिल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. काही लोकांना निवडणुका आल्यावर कार्यकर्त्यांची आठवण येते. एरव्ही हम दो हमारे दो असे म्हणत शिंदेंनी ठाकरेंवर टीका केली.

बाळासाहेबानंतर तुम्ही मराठी माणसांसाठी काय केले? याचा हिशोब द्या असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना सवाल केला. आता म्हणतात आम्ही हिंदुत्व सोडलं नाही मग बाळासाहेबांना हिंदूहृदयसम्राटतुम्ही का म्हणत नाही असा सवाल देखील एकनाथ शिंदे यांनी केला.

- सत्तेत असताना तिजोरी फोडा, आता आठवतोय मुंबईचा लढा त्यामुळे हे कॅम्पेन राबवत आहे. अशी टीका शिंदेंनी ठाकरेंवर केली आहे.
- दिनो मोरिआची चौकशी सुरु आहे त्याने तोंड उघडल्यावर किती लोकांचा मोरया होईल अशी टीका शिंदेनी ठाकरे गटावर केला.
- मला उबाठावर बोललं पाहिजे. त्यांच्यासारखं मी बोलत नसलो, मी डॉक्टर नसलो तरी मोठ मोठे ऑपरेशन करतो एकनाथ शिंदे गरजले.

## थोडक्यात महत्वाचे

# शहाड स्थानक परिसरातील बॅरिकेटिंगमुळे प्रवाशांचे हाल




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मध्यरेल्वेच्या शहाड रेल्वे स्टेशन वर तिकिट घर/तिकिट हॉल पासून सुमारे तोनशे ते साडेतीनशे मीटर अंतरावर रेल्वेच्या बांधकाम विभागाने बॅरेकेट लावले असून यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या हजारो दिव्यांग बांधवाना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे, शिवाय येथे नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यास किंवा पुर परिस्थिती उद्धवल्यास फायरब्रीगेडच्या गाड्या किंवा रुग्णवाहिका कशी जाणार असा प्रश्न पडला आहे, रेल्वेच्या या आडमुठ्या व मनमानी कारभारा विरोधात मोठ्या प्रमाणात तक्रारी करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

कल्याण कसारा मार्गावर शहाड हे महत्त्वाचे स्टेशन आहे, दररोज३०ते४०हजार प्रवासी या स्थानकातून प्रवास करतात.या स्टेशन च्या लगत पुर्वेला गेल्या १५ते२०वर्षापासून उल्हासनगर पालिकेच्या जागेवर अनाधिकृत पार्किंग सुरू होते, यातून रेल्वेच्या अधिका-यांना मलिदा भेटत होता अशी चर्चा आहे, परंतु उल्हासनगर पालिकेच्या उपायुक्त श्रीमती पवार यांनी ही अनाधिकृत पार्किंग हटवून पालिकेची जागा रिकामी करून येथे अधिकृत पार्किंग सुरू केली. पण हे रेल्वेला पटले नाही, त्यांनी तिकिट घरापासून३००ते३५०मीटर अंतरावर मनमानी पणे बॅरेकेट लावले, विशेष म्हणजे पश्चिमेला असे केले नाही, यामुळे दिंव्याग, वयोवृद्ध, गरोदर महिला, यांना ऐवढे अंतर चालत येवून तिकिट काढावे लागत आहे,शिवाय येथे काही अपघात घडला, किंवा नैसर्गिक आपत्ती ओढावली तर येथे रुग्णवाहिका किंवा फायरब्रीगेडची गाडी यायला जागा नाही, तसेच बाजूला मोठा नाला आहे, येथे पुरपरिस्थिती निर्माण झाल्यास मदत कशी करणार?असा प्रश्न पडतो.कालच म्हणजे१७जून रोजी एका प्रवाशाला अपघात झाला तर त्याला उपचारासाठी इतके अंतर बाहेर जावे लागले, तेंव्हा रुग्णवाहिका मिळाली, २०२१मध्ये स्टेशनला आग लागली होती, त्यामुळे ही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती.येथे येण्यासाठी पर्यायी मार्ग गुलशननगर मधून येतो परंतु हे अंतर एक ते दिड किलोमीटर इतके आहे, याचबरोबर तो मार्ग प्लॅटफार्म वर येतो,प्रत्येक महिन्याच्या १०तारखेला संपूर्ण महाराष्ट्रातून दिव्यांग बांधव उल्हासनगर येथे मोफत रेशन घेण्यासाठी येतात, त्यांची संख्या२००च्या वर असते, भारत राजपत्रात दिव्यांग प्रवाशांना रेल्वेत व प्लॅटफार्म वर सोईसुविधा पुरवाव्यात असे निर्देश आहेत, तरीही रेल्वेच्या मनमानी व आडमुठ्या पणामुळे याचा नाहक त्रास प्रवासी व नागरिकांना होत आहे.

याबाबत रेल्वे मंत्रालय तसेच वरीष्ठ अधिकारी यांच्या कडे तक्रारी करण्यात आल्याची खात्रीशीर माहिती आहे.याविषयी रेल्वेचे अभियंता ललित सोंळकी यांना विचारले असता ते म्हणाले, बॅरेकेट विषयी मंडळ रेल्वे प्रबंधक यांचे निर्देश आहेत व त्यानुसार हे काम केले आहे.

# रोशनी सोनघरेच्या पार्थिवावर डोंबिवलीत अंत्यसंस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

१२ जून रोजी अहमदाबाद येथे झालेल्या भीषण विमान दुर्घटनेत डोंबिवलीकर....२७ वर्षीय रोशनी सोनघरे हिचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानामध्ये रोशनी फ्लाइट क्रू म्हणून कार्यरत होती. ती डोंबिवली पूर्वेकडील राजाजी पथ परिसरातील नव उमीया कृपा सोसायटीमध्ये...आपल्या कुटुंबासह राहत होती. पण विमान दुर्घटनेचे तिचा करुण अंत झाल्याने..डोंबिवली परिसरात शोककळा पसरली. रोशनीचा मृतदेह आज घरी आणला गेला. आज तिच्यावर अंत्यसंस्कार करत असताना कुटुंबियांना अश्रू अनावर झाले. मृत्यूआधी केवळ एक आठवड्यापूर्वी कुटुंबाची तिच्याशी लग्नाबाबत चर्चा झाली होती. इन्स्टाग्रामवर रोशनीचे ५० हजार फॉलोअर्स होते. ती सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरही होती.







# उल्हास नदीच्या पाणी पातळीत वाढ

## नदी किनाऱ्यावरील गावांना सतर्कतेचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली परिसरसह उल्हासनदी खोर्यातील आजूबाजूच्या परिसरात गेल्या २४ तासापासून परिसरात पाऊस सुरु आहे. अधून मधून जोरदार पाऊस कोसळत असल्याने काही सखल भागात पाणी साचले आहे. उल्हास नदी मोहिली परिसरात पाणी दुथडी भरून वाहत असून मोहिली, आणि म्हारळ परिसराला जोडणारा पूल पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. उल्हास नदीच्या पाण्याची पातळी वाढली आहे. नदी किनारी राहणार्या नागरीकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असल्याची माहिती कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांनी देत उल्हासनदी पाणी पातळी वाढ पाहता मोहिली म्हारळला जोडणार्या पूलावरील वाहतूक बंद करणार असल्याचे सांगितले.

## रुंदे पूल पाण्याखाली गेल्याने ग्रामीण भागात जनजीवन विस्कळीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सलग दोन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागात जनजीवन विस्कळीत झाले आहे. नदी, ओढे आणि नाले दुथडी भरून वाहत आहेत. काही ठिकाणी पावसाचे पाणी घरात आणि शेतांमध्ये शिरल्यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांचे हाल सुरू आहेत.

रूंदे गावाजवळील काळू नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने फळेगाव, रूंदे, उशिद, हाल, मढ, पळसोली, काकडपाडा, दानबाव, आंबिवली, आराळे आणि भोंगळपाडा या १० ते १२ गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. आज सकाळपासूनच दोन्ही बाजूंनी नागरिक अडकून पडले असून चाकरमानी, व्यापारी, रिक्षाचालक, दूध व भाजीपाला विक्रेत्यांचे हाल होत आहेत. वेळेवर नोकरीवर पोहोचता न आल्याने कामावर परिणाम झाला आहे. दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठाही विस्कळीत झाला आहे.

सध्या प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असून नागरिकांनी सुरक्षित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाने पुढील काही तास मुसळधार पावसाचा इशारा दिला असल्यामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. पूल पाण्याखाली गेल्यामुळे स्थानिक लोक पाणी ओसरण्याची वाट पाहत आहेत. प्रशासनाकडून आपत्कालीन उपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# भिवंडी-वाडा महामार्गावर नेहरोली येथे रस्ता खचला



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा, ता. १९ (बातमीदार) :** तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्या, नाल्यांना पूर आला असून, नागरिकांचे जनजीवन विस्कळित झाले आहे. मुसळधार पावसात भिवंडी-वाडा महामार्गावरील नेहरोली येथे रस्ता खचल्याने वाहतूक ठप्प, तर घोडविंदे पुलावरून पाणी जात असल्याने येथील पाड्यांचा संपर्क तुटला आहे. गेले दोन दिवस तालुक्यात मुसळधार पाऊस पडत आहे. भिवंडी-वाडा महामार्गावरील नेहरोली येथे रस्ता खचल्याने येथे वाहतूक ठप्प झाली आहे. परिणामी वाहने पर्यायी मार्गावरून वळवण्यात आली आहेत. कळमखांड येथे एक झाड रस्त्यावर पडल्याने येथील वाहतूक काही काळ बंद होती. प्रशासनाकडून झाड हटवण्याचे काम सुरू होते. घोडविंदे पाडा येथील नाल्याला पूर आल्याने पुलावरून पाणी जात असल्याने येथील पाड्यांचा संपर्क तुटला आहे. घोणसई ग्रामपंचायतीच्या वतीने येथे कर्मचारी तैनात करून नागरिकांना पुलावरून जाण्यास मज्जाव केला जात आहे.

दरम्यान, तालुक्यात अतिदक्षतेचा इशारा जाहीर केला असून, घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भिवंडी-वाडा खचलेला रस्ता व कळमखांड येथे पडलेले झाड या दोन बाबी वगळता तालुक्यात अन्य नुकसान झाले नसल्याची माहिती तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे. प्रशासन लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी सांगितले.

# आमदार किसन कथोरे यांच्या निवासस्थानी भाजपा संकल्प सभेचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

केंद्रातील भाजपा सरकारला म्हणजेच मोदी सरकारला 11 वर्ष पुर्ण झाल्याबद्दल मुरबाड मध्ये भाजपाच्या वतिने आमदार किसन कथोरे यांच्या निवासस्थानी संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले होते. या संकल्प सभेला आमदार किसन कथोरे व ठाणे ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र डाकी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना आमदार किसन कथोरे व जितेंद्र डाकी यांनी मार्गदर्शन केले. जितेंद्र डाकी यांनी 2014 पुर्वीचा भारत व आताचा भारत यातील फरक स्पष्ट करून आज प्रत्येक क्षेत्रात मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली देश पुढे जात आहे. सबका साथ सबका विकास हे ब्रिद घेऊन सरकार काम करत आहे. 2047 ला भारत महासत्ता होण्यासाठी




पावले टाकत असल्याचे म्हटले .तर आमदार किसन कथोरे यांनी मोदी सरकारचा अमृत काळ, सेवा व सुशासन गरिब ,कष्टकरी, शेतकऱ्यांसाठी, सर्व सामान्यासाठी केंद्र सरकारने आणलेल्या विविध योजना सांगत मुरबाड मतदार संघात भविष्यात राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून होणारे मोठ मोठे प्रकल्पावर भाष्य केले. येणार्या काही वर्षात मुरबाड तालुका विकासाने खुप प्रगती पथावर असल्याचे सांगितले.गोवेली येथे गोडाऊन हब,सरळगाव एम.आय.डी.सी, बदलापूर ते लातूर नवा महामार्ग,माळशेज घाटातील स्काय वॉक, तसेच बारवी धरणग्रस्तां सारखे पुनर्वसन जर काळू धरणग्रंस्तांचे पुनर्वसन होणार असेल तरच काळू धरणाला मंजुरी देऊ अशी भुमिका यावेळी आमदार कथोरे यांनी मांडली असून ऐतिहासिक संगमेश्वर तिर्थ क्षेत्राचे नजर लागेल असे काम आपण करणार आहोत. यासाठी 75 कोटी रुपये अंदाजे खर्च येणार असून यापैकी 18 कोटीचे टेंडर निघाले असल्याची माहिती दिली.लवकरच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली हे काम सुरु होणार असल्याचे सांगून देवाच्या नावाने राजकारण करणार्यांचा समाचार घेतला.यावेळी मुरबाड तालुका खरेदी विक्री संघावर नुकतीच प्रशासकीय संचालक मंडळ नेमण्यात आले आहे यामधे चेअरमन म्हणून संतोष पवार व सर्व नवोदित संचालक मंडळाचा आमदार कथोरे व जितेंद्र डाकी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच सभेला उल्हास बांगर, भाजपा मंडळ अध्यक्ष दिपक पवार, जितेंद्र भावार्थे व चेअरमन संतोष पवार यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.यावेळी मोठ्या संख्येने भाजपाचे पदाधिकारी, मा.पंचायत समिती सदस्य, सरपंच, महिला आघाडी, व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.









# वर्षा ऋतू आणि आरोग्य : आयुर्वेदाच्या दृष्टीने काळजी घेण्याचा उत्तम काळ

– वैद्य. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे
(B.A.M.S, M.D. आयु.)
फोन: ९९२०३७७७९९

वर्षा ऋतू म्हणजे निसर्गाची उल्हासित होण्याची वेळ. पण या ऋतूमध्ये हवा दमट, ओलसर व थोडी थंड असते. हीच वेळ आपल्या शरीरासाठी थोडी संवेदनशीलही असते. आयुर्वेद शास्त्रानुसार पावसाळ्यात शरीरातील वातदोष वाढतो. त्यामुळे सांधेदुखी, पाठदुखी, अंगात जडपणा, थकवा, अपचन, आणि त्वचारोग यांची शक्यता वाढते. पावसामुळे जमीनीतील सत्त्वही कमी होतं, ज्याचा परिणाम अन्नपदार्थांच्या गुणवत्तेवर होतो आणि त्यामुळे पचनशक्ती कमकुवत होते.

या काळात शरीराची प्रतिकारशक्ती कमी झालेली असते. वातावरणात वाढलेली ओलसरता, अपुरी सूर्यप्रकाश आणि दूषित पाणी व अन्न यांच्या संपर्कामुळे जुलाब, उलटी, सर्दी, खोकला, ताप, त्वचारोग आणि अशक्तपणा अशा तक्रारी उद्भवू शकतात. यासाठी योग्य आहार आणि विहार (रोजच्या सवयी) यांची काळजी घेणं खूप गरजेचं आहे.

पावसाळ्यात गरम, थोडंसं स्निग्ध (तूप किंवा तेलयुक्त) आणि हलकं पचणारे अन्न घ्यावं. उकडलेलं, गरम पाणी प्यावं आणि शक्यतो लसूण, आलं, हिंग, सुकं खोबरं, हळद यांचा वापर नियमित करावा. दही, भजी, थंड पेय, साखर, पचायला जड अन्न, आणि शिळं अन्न टाळावं.



सकाळी किंवा संध्याकाळी गरम पाण्याने अंघोळ करणे, शरीराला तेल लावणे आणि ओले कपडे लवकर बदलणे या गोष्टी अंगवळणी पाडाव्यात.

या ऋतूमध्ये पंचकर्म उपचारांचे विशेष महत्त्व आहे. पंचकर्म म्हणजे शरीर शुद्ध करणारे आयुर्वेदातील पाच प्रकारचे उपचार, जे केवळ आजारासाठी नव्हे तर नियमित आरोग्य रक्षणासाठी देखील उपयोगी आहेत.

पावसाळ्यात शरीरात साचलेले दूषित घटक (टॉक्सिन्स) वाढतात आणि वातदोषाचे प्रमाण चढते. त्यामुळे याकाळात काही पंचकर्म प्रकार अतिशय फायदेशीर ठरतात.

या ऋतूत सर्वात उपयुक्त उपचार म्हणजे बस्ती — म्हणजे विशिष्ट औषधी तेल किंवा काढा गुदमार्गातून देऊन शरीरात साचलेला वात दोष बाहेर टाकणे. बस्तीमुळे सांधेदुखी, पाठदुखी, गुडघेदुखी, थकवा आणि पचनाशी संबंधित तक्रारी कमी होतात.

दुसरा महत्वाचा उपचार म्हणजे अभ्यंग व स्वेदन – म्हणजे संपूर्ण शरीराला औषधी तेल लावून त्यावर वाफ देणे. यामुळे त्वचेची काळजी घेतली जाते, रक्ताभिसरण सुधारते आणि शरीर हलकं वाटतं.

नस्य म्हणजे नाकात औषधी तेल टाकण्याची प्रक्रिया – ही सर्दी, डोकेदुखी, ऍलर्जी व श्वासाचे विकार टाळण्यासाठी उपयोगी ठरते.

पावसाळ्यात यासारखे उपचार संपूर्ण शरीराला शुद्ध करतात आणि ऋतुपरिवर्तनामुळे होणारे त्रास टाळतात.

वर्षा ऋतू म्हणजे निसर्गासोबत पुन्हा एकदा संतुलन साधण्याची वेळ. त्यामुळे या काळात संधी मिळेल तिथे शांतता, विश्रांती आणि सेंद्रिय व पचायला सोपं अन्न यांचं सेवन करावं. रोजचा दिनक्रम ठरलेला असावा, भरपूर झोप घ्यावी, पण दिवसा झोपणं टाळावं. पावसात भिजणं, थेट थंड वाऱ्यात बसणं, किंवा ओल्या कपड्यांमध्ये फार वेळ राहणं यापासून दूर राहावं.

### काय खावं?

- गरम, ताजं, आणि हलकं अन्न घ्या.
- भातावर तुपासोबत साजूक सूप (काढा), मूग डाळ, औषधी मसाल्यांनी केलेली खिचडी.
- आले, हिंग, जिरे, धणे, सुकं खोबरं यांचा वापर वाढवा.
- गहू, ज्वारी,यांसारख्या धान्यांचा आहारात वापर करा.
- गरम पाणी किंवा उकळून थंड केलेलं पाणी प्या.
- साजूक तुप ,तेल योग्य प्रमाणात वापरावं ङ्ग यामुळे वात नियंत्रणात राहतो.
- जांभूळ, अननस, संत्री, आवळा यांसारखी फळं उपयुक्त ठरतात.
- हळद, लसूण आणि सुकं आले यांचा वापर रोग प्रतिकारशक्ती वाढवतो.

### काय टाळावं?

- दही, फ्रीजमध्ये ठेवलेलं अन्न, कोल्ड ड्रिंक्स, आंबट व खारट पदार्थ.
- तळलेले, शिळे, पचायला जड अन्न टाळावं.
- थेट फळांच्या रसांपेक्षा फळंच चावून खाल्लेली चांगली.

### आयुर्वेद सांगतो

– जर आपण ऋतुनुसार आहार–विहार आणि उपचार पद्धती स्वीकारली, तर आजारांपासून दूर राहून आपण आनंदी जीवन जगू शकतो. वर्षा ऋतू ही आपली चाचणी नसून, आरोग्य सावरण्याची आणि शरीर शुद्धीची सुवर्णसंधी आहे.

– आपल्या आरोग्यासाठी काळजी घ्या, ऋतुनुसार जगा आणि निसर्गाशी सुसंवाद साधा!

## गीतासार



अध्याय १४

### गुणत्रयविभागयोगः

श्रीभगवानुवाच परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् । यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥ १४-१ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, ज्ञानांतीलही अती उत्तम ते परम ज्ञान मी तुला पुन्हा सांगतो की, जे जाणल्याने सर्व मुनिजन या संसारातून मुक्त होऊन परम सिद्धी पावले आहेत. ॥ १४-१ ॥

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः । सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च ॥ १४-२ ॥

हे ज्ञान धारण करून माझ्या स्वरूपाला प्राप्त झालेले पुरुष सृष्टीच्या आरंभी पुन्हा जन्माला येत नाहीत आणि प्रलयकाळीही व्याकुळ हौत नाहीत. ॥ १४-२ ॥

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् । सम्भवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ १४-३ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), माझी महद्ब्रह्मरूप मूळ प्रकृती संपूर्ण भूतांची योनी म्हणजे गर्भधारणा करण्याचे स्थान आहे आणि मी त्या योनीच्या ठिकाणी चेतनसमुदायरूप गर्भाची स्थापना करतो. त्या जड-चेतन संयोगाने सर्व भूतांची उत्पत्ती होते.
॥ १४-३ ॥

सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः सम्भवन्ति याः ॥ तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता
॥ १४-४ ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), नाना प्रकारच्या सर्व जातीत जितके शरीरधारी प्राणी उत्पन्न होतात, त्या सर्वांचा गर्भ धारण करणारी माता प्रकृती आहे आणि बीज स्थापन करणारा पिता मी आहे. ॥ १४-४ ॥

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः । निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम्
॥ १४-५ ॥

हे महाबाहो अर्जुना, सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण हे प्रकृतीपासून उत्पन्न झालेले तिन्ही गुण अविनाशी जीवात्म्याला शरीरात बांधून ठेवतात.
॥ १४-५ ॥

# भिवंडीत जल व मल मालमत्ता करवाढी विरोधात काँग्रेसची निदर्शने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी महानगरपालिका प्रशासनाने बेकायदेशीरपणे वाढवलेली जल व मलकर तातडीने रद्द करावी अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्याकडे केली होती मात्र त्यांनी दुर्लक्ष केले होते अखेर संतप्त झालेल्या काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी माजी आमदार रशिद ताहीर मोमीन यांच्या नेतृत्वाखाली महापालिका मुख्य कार्यालय इमारतीच्या प्रवेशद्वारावर जोरदार घोषणाबाजी करीत निदर्शने करून पालिकेच्या लोखंडी प्रवेशद्वाराला कुलूप ( टाळे) लाऊन बैठक मारून महापालिका प्रशासनाचा गलथान कारभाराचा निषेध व्यक्त केला. त्यामुळे पालिकेतील कर्मचारी व अधिकाऱ्यामधे धावपळ उडाली होती.यावेळी अनुचित प्रकार घडू नये यासाठी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



भिवंडी महानगरपालिका प्रशासनाने जल लाभ व मल लाभ या मालमत्ता करा मध्ये वाढ केली आहे.निवासी मालमत्तांना 15 टक्के तर वाणिज्य मालमत्तांना 23 टक्के या दराने ही करवाढ केल्यामुळे भिवंडीतील नागरिकांमध्ये या विरोधात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.मालमत्ता कर रद्द करावा यासाठी भाजप व शिवसेनेचे पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना निवेदन काही दिवसांपूर्वी दिले होते मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने पालिका आयुक्तांचे विरोधात नागरिकां मध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होता अखेर काँग्रेसचे भिवंडी शहराध्यक्ष माजी आमदार रशीद ताहीर मोमीन यांच्या नेतृत्वाखाली आज सायंकाळी महापालिका मुख्यालया समोर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्तेनी निदर्शने करीत संताप व्यक्त केला आहे.यावेळी संतप्त पदाधिकाऱ्यांनी मुख्यालय प्रवेशद्वारावरील गेटला कुलूप (टाळे) ठोकत तेथेच बैठक मारून पालिका प्रशासनाचा निषेध व्यक्त केला आहे.या आंदोलनात माजी खासदार सुरेश टावरे, प्रदेश सरचिटणीस तारिक फारूखी,सोहेल खान,रुकसाना कुरेशी,आर्शि आजमी,सलाम शेख, लतीफ बाबा यांच्यासह अनेक पदाधिकारी माजी नगरसेवक,कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर ठोकले टाळे..**

पालिका प्रशासनाने चालू वर्षीच्या घरपट्टी सोबत नवीन जल लाभ व मल लाभ कर वाढ करून घरपट्टी वसुलीची बिले दिली आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड आक्रोश आहे.२०११ मध्ये पालिका प्रशासनाने अशी दरवाढ केली होती. त्यास नगरसेवकांनी विरोध केल्यानंतर तो स्थगित केला होता.११ फेब्रुवारी रोजी पालिका प्रशासनाचे प्रमुख प्रशासक असलेल्या आयुक्तांनी ही दरवाढ पुन्हा लागू केली आहे.प्रशासकांना अशी कोणतीही दरवाढ करण्याचा अधिकार नाही.करवाढ रद्द करावी अशी मागणी केली होती मात्र आयुक्तांनी याबाबत दुर्लक्ष केले त्यामुळे लोक आग्रहास्तव आंदोलन करण्यात आले असून आयुक्त पालिका प्रशासनाने त्वरित या दरवाढीस स्थगिती द्यावी अशी मागणी काँग्रेस शहराध्यक्ष रशीद ताहीर मोमीन यांनी केली आहे.

# जिल्हा परिषद ठाणे येथे २४ कर्मचाऱ्यांना कनिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नती



### मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्याकडून पदोन्नत कर्मचाऱ्यांना शुभेच्छा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत आज, दि. १९ जून, २०२५ रोजी शिपाई संवर्गातून २२, वाहनचालक संवर्गातून २, असे एकूण २४ कर्मचाऱ्यांना कनिष्ठ सहाय्यक (वर्ग-३) या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

या पदोन्नतीविषयी माहिती देताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) अविनाश फडतरे यांनी सांगितले की, “कार्यक्षमतेच्या आधारे पदोन्नतीची ही प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली असून, समुपदेशनाने पदोन्नती प्रक्रिया पार पाडली आहे.”

या पदोन्नतीच्या निमित्ताने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सर्व नवपदोन्नत कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करताना असे सांगितले की "पदोन्नती ही केवळ पदवृद्धी नसून, आपल्या सेवाभावाला, प्रामाणिकपणाला आणि कार्यक्षमतेला मिळालेली पावती आहे. नव्या जबाबदाऱ्या ही संधी आहेत. जिल्हा परिषदेच्या प्रगतीला हातभार लावण्याची. आपण सर्वांनी एकजुटीने जिल्हा परिषद ठाणेची कामगिरी अधिक समृद्ध आणि उल्लेखनीय बनवावी, हीच माझी मनःपूर्वक शुभेच्छा!”

यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं) प्रमोद काळे, कार्यकारी अभियंता प्रकाश सासे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कर्मचाऱ्यांच्या सेवेत झालेल्या पदोन्नतीमुळे कार्यालयीन कार्यप्रवाह अधिक प्रभावी व परिणामकारक होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# महात्मा गांधी स्मारक रुग्णालयाला सर्वोत्तम कामगार रुग्णालय बनविणार

### – सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : महात्मा गांधी स्मारक रुग्णालयाला गतवैभव मिळवून देत राज्यातील सर्वोत्तम कामगार रुग्णालय बनविणार असल्याचा मानस सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.

महात्मा गांधी स्मारक कामगार रुग्णालयातील सभागृहात आयोजित बैठकीत मंत्री श्री. आबिटकर बोलत होते. बैठकीस विधान परिषद आमदार चित्रा वाघ, केंद्रीय कामगार विमा योजनेच्या क्षेत्रीय संचालक अभिलाषा झा, राज्य कामगार विमा योजनेचे आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, कामगार रुग्णालय मुख्य अभियंता अश्विन यादव, रुग्णालय अधीक्षिका मेघा आयरे आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, महात्मा गांधी स्मारक रुग्णालय हे मुंबईतील एक महत्त्वाचे व मध्यवर्ती ठिकाणी असलेले रुग्णालय आहे. या रुग्णालयात सर्व वैद्यकीय सेवा तातडीने सुरू कराव्यात, विशेषतज्ज्ञांची पदे भरावीत. केईएम रुग्णालयात बेड उपलब्ध होऊ न शकणाऱ्या तसेच महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत उपचार घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांना या रुग्णालयाने उपचार द्यावेत. दक्षता विभाग तातडीने सुरू करून रुग्णालयाकरिता आवश्यक यंत्रसामग्री व मागण्यांचा प्रस्ताव तातडीने द्यावा, अशा सूचनाही मंत्री श्री. आबिटकर यांनी दिले.

रुग्णालयाला आरोग्य मंत्री यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान शस्त्रक्रिया कक्ष, स्त्री रुग्ण कक्ष, बालकांचा कक्ष, व्हेंटिलेशन रूम, तसेच रुग्णालयातील विविध सुविधांची आणि परिसराची पाहणी केली.

कामगार रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचा ग्रॅज्युएटी संदर्भातील १५ वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न आरोग्यमंत्र्यांनी सोडवल्याबद्दल यावेळी कर्मचारी संघटनेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सन १९६२ नंतर मुंबईतील महात्मा गांधी रुग्णालयाला भेट देणारे मंत्री प्रकाश आबिटकर हे पहिले आरोग्यमंत्री असल्याचे आमदार चित्रा वाघ यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार निधीतून दिलेल्या सुविधा, रुग्णालयातील नूतनीकरण केलेले सभागृह व पोर्टेबल एक्स-रे मशीनचे उद्घाटन सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले.

# काटेमानिवली परिसरातील अनधिकृत बांधकामांवर ‘ड’ प्रभागामार्फत कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्व, काटेमानिवली परिसरात अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या बांधकामांवर काल ड प्रभागामार्फत पोलीस बंदोबस्तात निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईत गणेश टेकडीवरील गणेश मंदिराजवळील अंदाजे २०x२० फुटांचे पत्रा शेड, १५x२० फुटांचे ताडपत्री शेड, बाथरूमचे वीट बांधकाम, तसेच गणेश टेकडीच्या पायथ्याशी बांधलेले अंदाजे १५x१५ फुटांचे प्रार्थना स्थळाचे मंडप बांधकाम यांचा समावेश होता. महापालिकेचे अधिकृत ठेकेदार, मनपा कर्मचारी व गॅस कटरच्या सहाय्याने हि कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान प्रार्थना स्थळातील हनुमान मूर्ती व इतर देवी-देवतांचे फोटो यांच्याशी संबंधित धार्मिक भावना दुखावणार नाही, याची विशेष दक्षता घेण्यात आली. उपस्थित पांडे यांच्या स्वाधीनतेने संबंधित मूर्ती व



फोटो फ्रेम त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. महापालिकेने कोणत्याही प्रकारचे सामान जप्त केलेल नाही. तसेच या ठिकाणी उभारलेल्या १५x१५ फुटांच्या झोपडीत एक कुटुंब वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आले. सध्या पावसाचे वातावरण असल्यामुळे या झोपडीवरील कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली असल्याची माहिती ड प्रभागाचे सहा. आयुक्त उमेश यमगर यांनी दिली.

## आरोग्य

# थकवा कमी करण्यासाठी योगासन करा

**मांडुकासन :** मांडुकासनाचा थेट परिणाम पोट आणि स्वादुपिंडावर होतो, ज्यामुळे इन्सुलिन स्राव सुधारतो. त्यामुळे पोटाची चरबी कमी होण्यास आणि पचन सुधारण्यास देखील मदत होते. याशिवाय, दररोज योगा केल्याने थकवा कमी होतो आणि शरीर सक्रिय राहते.

**धनुरासन :** धनुरासनात, शरीर धनुष्याच्या स्थितीत येते, ज्याचा परिणाम पोट आणि यकृतावर होतो. त्यामुळे साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते. यामुळे तुमचा लठ्ठपणा नियंत्रणात राहतो. त्यामुळे शरीराला आराम मिळतो आणि रक्तप्रवाह संतुलित होतो. हे ताण कमी करण्यास आणि थकवा दूर करण्यास देखील प्रभावी आहे.

**बालासन :** बालासन योगाला बाल आसन असेही म्हणतात. यामुळे ताण कमी होण्यास मदत होते. असे केल्याने शरीरात रक्ताभिसरण चांगले राहते. असे केल्याने मान आणि खांद्याशी संबंधित समस्या देखील दूर राहतात. यामुळे तुमचे वजन देखील नियंत्रणात राहते.

**वज्रासन :** वज्रासन केल्याने शरीरातील रक्तप्रवाह चांगला राहतो. याशिवाय वज्रासन केल्याने बद्धकोष्ठता आणि गॅसची समस्याही दूर होते. उच्च रक्तदाबाचा त्रास असलेले लोक त्यांच्या दैनंदिन दिनचर्येत वज्रासनाचा समावेश करू शकतात. यासोबतच थकवाही दूर होतो आणि तुम्ही सक्रिय राहता.



## आजचे राशिभविष्य

**मेष**
ऑफिसमध्ये एखाद्या प्रोजेक्टचे नेतृत्व तुम्हाला करावे लागेल किंवा व्यवसायात महत्त्वाची डिल होण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल.

**वृषभ**
कामात फोकस ठेवा तसेच कागदपत्रे व्यवस्थित तापसून पाहा.आज असे काही निर्णय घ्यावा लागू शकतो जो इतरांसाठीही महत्त्वाचे असतील.

**मिथुन**
तुमची उपस्थिती तसेच तुमचे मत गांभीर्याने घेतले जाईल. ही वेळ आत्मविश्वासाने पुढे जाण्याची आहे. तुमच्यात अहंकार वाढू शकतो त्याकडे दुर्लक्ष करा.

**कर्क**
गर्व केल्यामुळे काहीही साध्य होत नाही. घरात तुमचे वजन वाढेल आणि घरातील अनेक कामे तुम्ही मार्गी लावाल.तुम्ही खूप जास्त भावनिक होणार आहात.

**सिंह**
एखाद्या जवळच्या व्यक्तीसोबत मनातलं बोलण्याची संधी मिळेल, ज्यामुळे नातेसंबध अधिक द्दढ होतील त्याचबरोबर तुम्हाला मानसिक समाधान मिळेल.

**कन्या**
काही कामांमध्ये संभ्रम किंवा निर्णय घेण्याची अडचण होवू शकत अशावेळी तुमचे मन काय सांगते ते ऐका तुम्हाला नक्की मार्ग सापडेल.

**तूळ**
प्रेमसंबंधात नाते अधिक मधुर होईल, एकमेकांना जास्त वेळ देण्याचा प्रयत्न करा. विचारांनी लोकांचं लक्ष वेधून घेणार आहात.उत्तम यश मिळेल.


**वृश्चिक**
तुमचे मत किंवा विचार तुम्ही चांगल्या प्रकारे इतरांना समजावून सांगणार आहात. मित्रांशी किंवा सहकाऱ्यांशी मोकळ्या मनाने संवाद साधा. संवाद साधल्यामुळे तुमचा मानसिक ताण कमी होईल.

**धनु**
एखादा जुना प्रोजेक्ट पुन्हा तुमच्याकडे येवू शकतो त्याचा स्विकार करा.उद्दिष्टांवर ठाम राहावं लागेल. बदल सकारात्मक आहेत त्याचा स्विकार करा.

**मकर**
व्यावहारिक काम आणि कागदपत्रांशी संबंधित मुद्दे समोर येतील, तुम्ही घाबरु नका. व्यवस्थित समजून घ्या आणि मार्गक्रमण करा. कामे संथ गतीने होतील.

**कुंभ**
घरात वातावरण ठिक असेल. नोकरी किंवा व्यवसायात काही अडचणी येवू शकतात.तुम्हाला अनेक बदलाचा सामना करावा लागू शकतो.

**मीन**
काही नवीन लोकांना भेटण्याचा विचार करू शकता. नवीन संधी मिळाली तर त्याचा लाभ घ्या.




## शहापुरातील आरोग्य समस्या सोडवण्यासाठी
# माजी आमदार पांडुरंग बरोरा यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : ठाणे जिल्हयातील शहापूर हा एकमेव आदिवासी व दुर्गम तालुका आहे. शहापूर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय असून या रूग्णालयावर अवलंबून असणाऱ्या रूग्णांची संख्या देखिल मोठी आहे. शहापूर तालुक्यातील बहुतांशी जनता उपचारासाठी उपजिल्हा रूग्णालयाचा आधार घेत असुन रूग्णालयातील डॉक्टरांची पदे रिक्त असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. उपजिल्हा रूग्णालयात या महिन्यात सर्पदंश झाल्याने रूग्णालयात दाखल झालेल्या ३ रूग्णांचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याने नागरीकांमध्ये रूग्णालयाबाबत असंतोष पसरला आहे. उपजिल्हा रूग्णालयातील वारंवार असणाऱ्या रिक्त पदांमुळे गोरगरीब नागरीकांना टेस्ट आणि उपचारासाठी खाजगी रूग्णालयांचा आधार घ्यावा लागत असून ही खर्चिक आणि खेदाची बाब आहे. रूग्णालयासाठी मंजूर असलेली प्रमुख पदे, स्त्रीरोगतज्ञ, भूलतज्ञ, बालरोग तज्ञ, सी.टी. स्कॅन ऑपरेटर वारंवार रिक्त असल्याने उपजिल्हा रूग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरीकांची प्रचंड गैरसोय होत असते.

शहापूर उपजिल्हा रूग्णालयासाठी प्रशस्त इमारती उपलब्ध असून देखिल इमारतीमधे व आजुबाजूच्या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तालुक्यातील बराचसा भाग मुंबई-आग्रा महामार्गालगत असून महामार्गावर मोठ्या प्रमाणावर अपघात घडत असतात. अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार होणे गरजेचे असूनही ग्रामिण भागातील किंवा अपघातग्रस्तांना ठाणे, मुंबई येथे उपचारासाठी जावे लागते. हे त्रासदायक असुन खर्चिक देखील आहे. ट्रामा केअर सेंटर शहापूर मध्ये सुरू झाल्यास रूग्णांची अपघातग्रस्त रूग्णांना वेळेत उपचार मिळाल्यास त्यांचा जीव वाचविणे शक्य होईल. ग्रामीण आणि दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्था सुस्थितीत ठेवण्यासाठी आरोग्य विभागाने शर्थीचे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथील नागरिकांची आरोग्य विषयक गैरसोय लक्षात घेता शहापूर उपजिल्हा रूग्णालयातील डॉक्टरांची रिक्तपदे भरणे, ट्रामा केअर सेंटर मंजूर करणे, सिटीस्कॅन सेवा कायम उपलब्ध ठेवणे, अतिदक्षता कक्ष, व्हेंटिलेटर, पुरेसा व अत्यावश्यक औषधसाठी उपलब्ध करणे व रूग्णालय व परिसर स्वच्छ ठेवणेबाबत संबधितांना त्वरीत सूचना कराव्यात अशी मागणी माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी मुंबई येथील मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी वनमंत्री गणेश नाईक,माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील व राम माळी उपस्थित होते.

## केडीएमसी , आर्ट ऑफ लिव्हींग व एसकेडीसीएल यांच्या संयुक्त विद्यमाने
# योग दिनाचे आयोजन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** :आंतरराष्ट्रीय योग दिनी म्हणजेच दि. 21 जून रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिका, आर्ट ऑफ लिव्हींग आणि एसकेडीसीएल यांचे संयुक्त विद्यमाने योग दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत, कल्याण स्थानका नजीकच्या कै.दिलीप कपोते वाहन तळावरील सहाव्या मजल्यावरील मोकळया जागेत या योग दिन शिबीराचे आयोजन सकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत करण्यात आले असून, सदर दिवशी महापालिका अधिकारी, कर्मचारी वर्ग योगाभ्यासाचा लाभ घेणार आहेत.

आर्ट ऑफ लिव्हींगचे जेष्ठ, अनुभवी प्रशिक्षक उपस्थितांना योगाभ्यासाचे प्रशिक्षण देणार असून, यावेळी उपस्थितांसाठी स्नॅक्स व जलपानाची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती विशेष प्रकल्प विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी दिली आहे.

योगामुळे मनाची एकाग्रता वाढण्यास तसेच ताण तणाव दूर होण्यास मदत होते. त्यामुळे आजच्या धकाधकीच्या काळात महापालिका , आर्ट ऑफ लिव्हींग व एसकेडीसीएल यांचेमार्फत योग दिनी आयोजित करण्यात आलेल्या या योग शिबीराचा सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन कल्याण डोंबिवली महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे.

# देह विक्री करणाऱ्या महिलांना
## सक्षम होणेकरिता महानगरपालिकेचा मदतीचा हात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाच्या महिला बाल कल्याण योजनेंतर्गत देह विक्री करणाऱ्या महिला / मुली यांना त्या क्षेत्रातून पुर्णतः बाहेर पडून सक्षम होणेकरिता त्यांना रोजगार उपलब्ध करुन, त्यांच्या पुर्नवसनाची योजना आखण्यात आली होती. या योजनेंगर्त या महिलांना भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांच्या हस्ते दिव्याकरिता आवश्यक असणाऱ्या फुलवाती बनविणाऱ्या मशिनचे वाटप करण्यात आले.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हनुमान टेकडी परिसरात देहविक्री करणाऱ्या महिलांचा परिवर्तन महिला बचत गट, खदान रोड, हनुमान टेकडी, भिवंडी यांना त्यांच्या विनंतीनुसार महानगरपालिकेने ८ फुलवाती बनविणाऱ्या मशीन पुरविल्या आहेत. या मशीनमुळे या सर्व महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होऊन त्या स्वावलंबी होऊ शकतील. आता सुरू होणारे सणवार, उत्सव या कालावधीमध्ये दिव्याच्या फुलवातींना मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे या महिलांना चांगल्या प्रकारे रोजगार प्राप्त होऊन त्यांना आर्थीक लाभ देखील मिळू शकतो. या महिलांचा बचत गट हा श्री साई सेवा संस्था या संघटनेच्या मार्गदर्शनाखाली काम करुन फुलवातींचे उत्पादन करणार आहे. या महिलांकडून उत्पादन केलेल्या फुलवातींची खरेदी शहरातील नागरीकांनी करुन त्यांच्या कार्यास हातभार लावावा अशी अपेक्षा श्री साई सेवा संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्वाती सिंग यांनी केली. तसेच, मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनीदेखील अशाच प्रकारचा विश्वास व्यक्त करुन या बचत गटांना मशिनचे वाटप केले आणि शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, मा. उपायुक्त (समाज कल्याण) श्री. विक्रम दराडे, मा. सहायक आयुक्त (समाज कल्याण) श्री. शैलेश दोंदे, श्री साई सेवा संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्वाती सिंग, परिवर्तन महिला बचत गटाच्या सदस्य आणि समाज कल्याण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आ.राजेंद्र गावित यांची मुख्यमंत्री यांच्याकडे
# पालघर शहर व २६ गावांसाठी अतिरिक्त पाणीपुरवठा मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : पालघर शहर व २६ गाव पाणीपुरवठा योजना सन २००८ मध्ये कार्यान्वित करून सन २०११ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हि योजना पालघर नगरपरिषद यांच्या कडे हस्तांतरित केलेली. पाणीपुरवठा करण्यात साठी लागणारे मनुष्यबळ, देखभाल, दुरुस्ती, पंपींग आदी आर्थिक खर्च. पालघर नगरपरिषद ७३.८% टक्के व उर्वरित २६.९२% टक्के खर्च पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या ग्रामपंचायती यांनी अदा करावयाचे होता.परंतु स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायती) यांनी पाणी पट्टी वसुली होत नसल्याचे कारण पुढे करीत असल्याचे संपूर्ण खर्चाचा भार पालघर नगर परिषदेला उचलावा लागत आहे.

तसेच आजच्या परिस्थितीत या सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजने अंतर्गत,१८ गावांना सुध्दा पालघर नगरपरिषद नेण्याकरिता कार्यान्वित पाणीपुरवठा यंत्रणेतून अंदाजे, १४ MLD पाणी उचलले जाते. पालघर नगरपरिषदेसाठी ८ MLD पाणी उपलब्ध असून उर्वरित ५ MLD पाणी ग्रामीण भागात व १ MLD पाणी पालघर जिल्हा कार्यालय संकुलासाठी पाणीपुरवठा करण्यात येत आहे.



या अनुषंगाने राजेंद्र गावित आमदार पालघर, यांनी मा. श्री.देवेंद्र फडणवीस - मुख्यमंत्री यांना लेखी पत्राद्वारे कळवून वाढीव पाणीपुरवठा मागणी केली आहे. त्या लिहलेले आहे, पालघर नगरपरिषद यांच्या कडून त्यांच्या साठी सुर्या प्रकल्पातून २१ MLD पाणीपुरवठा करण्यात यावा प्रस्ताव पाठवून प्रस्तावा द्वारे पाणीपुरवठा मागणी केली आहे. तर ग्रामीण भागातून अंदाजे ५ ते ६ MLD पाणीपुरवठा मागणी होत आहे. तर मुख्यमंत्री यांनी पालघर शहराचे होणारे विस्तारीकरण / नागरीकरण, लक्षात घेता, अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यासाठी पाण्याचा स्रोत तसेच इतर पाण्याचे स्त्रोत जलसिंचन व पाटबंधारे विभाग मार्फत निर्माण करून मागणी असलेल्या पाण्याची सोय करण्यात यावी.

# शिवसेनेच्या वर्धापनदिनी डोंबिवलीत वृक्षारोपण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या उपस्थितीत पश्चिमेकडील बावन्नचाळ मैदानात वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाला जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे, जिल्हा संघटक तात्यासाहेब माने, शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे, माजी नगरसेवक सुधाकर वायकोळे, महिला विधानसभा संघटिका सुप्रिया चव्हाण, महिला शहर संघटिका प्रियंका विचारे, उपशहर प्रमुख संजय पाटील, शाम चौगुले, शाखाप्रमुख आकाश पाटील, राजेश पाटील, सुरज पवार इत्यादी पदाधिकारी सोबत समस्त महिला आघाडी आणि युवासैनिक तसेच अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान पत्रकारांनी आमदार गोगावले यांच्या घरी अघोरी पूजा विषयीचा व्हिडिओ व्हायरल होत असल्याचे शिवसैनिक म्हणत आहेत असे विचारता जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे म्हणाले, गोगवले हे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व रश्मी ठाकरे यांच्याबद्दल टीका करत आहेत, पण ते विसरले की त्यांना पहिल्या आमदारकिचे तिकीट मातोश्रीने दिले होते. एवढ्या मोठया माणसाने मोठ्या पदावर बसवलं त्यांच्यावर असे वक्तव्य करणे म्हणजे गोगवले यांची पातळी किती खालची आहे हे दिसते.

तसेच महाराष्ट्रातील शाळांमध्ये पहिलीपासून ज्या सहा भाषा ऐच्छिक आहेत त्यात हिंदी भाषा आहे. सरकारच्या या निर्णयाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कडाडून विरोध केला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन असे होऊ देणार अशी भूमिका घेतली.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मनसेच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.ठाकरेंच्या शिवसेनेचे कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी हिंदी भाषा शक्तीमागे मोठे राजकारण असल्याचा सरकारवर आरोप केला. डोंबिवलीत पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले.

तसेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे. हिंदी भाषेला शक्तीचा विरोध शिवसेना उद्धव बाबासाहेब ठाकरे पक्ष करीत होता. आदित्य ठाकरे यांनी मुखमंत्र्याची भेट घेऊन हिंदी भाषा सक्तीबाबत चर्चा केली होती. शिवसेनेने महाराष्ट्रभर जनआंदोलन केले होते. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जी भूमिका घेतली आहे ती योग्य आहे. सरकारने हिंदीची सक्तीची करून त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षही याच मताचा आहे की हिंदी भाषेसाठी शक्ती. मराठी भाषा ही महाराष्ट्राचा अभिमान आहे, महाराष्ट्राची अस्मिता आहे, ती जपण्यासाठी आमचा पक्ष जे काही करायचे आहे ते आम्ही करू. हिंदी भाषेचे जे पुरस्कर्ते आहेत त्यांना सांगू इच्छितो की आपण हा हट्टहासं सोडा. महाराष्ट्रात हिंदि भाषा प्रमोट करत असाल तर त्याचा परिणाम तुम्हाला भोगावा लागेल. हिंदी भाषा सक्तीची केली जात असेल तर त्यामागे मोठे राजकारण आहे असेही म्हात्रे यांनी सांगितले.

## भिवंडीतील बेकायदा शाळांचे
# वीज - पाणी खंडीत करण्याचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात परवानगीशिवाय चालणाऱ्या बेकायदेशीर शाळांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. भिवंडीतील बेकायदा शाळांविरोधातील ल कारवाईची मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाने केली असून आंदोलनाचा इशारा दिला होता. अखेर याची दखल घेत मनपा प्रशासनाने बेकायदा शाळांचे वीज आणि पाणी जोडणी खंडीत करण्याचे आदेश दिले आहेत.

महानगरपालिका प्रशासनाने घोषित केलेल्या १८ बेकायदेशीर शाळांव्यतिरिक्त आणखी ५ अनधिकृत शाळांची यादी देऊन परवानगीशिवाय चालणाऱ्या सर्व शाळांवर कारवाई करण्याची मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाने केली आहे. १५ दिवसांत बेकायदेशीर शाळांवर कारवाई न केल्यास, पक्ष महानगरपालिका मुख्यालयासमोर आंदोलन करणार असा इशाराही त्यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिला आहे. याची दाखल घेत पालिकेने अवैध शाळांचे पाणी आणि वीज खंडित करण्याचे आदेश संबंधित विभागास दिले आहेत.

शिक्षण विभाग, महाराष्ट्र आणि भिवंडी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन शहरात चालणाऱ्या अनधिकृत शाळा आणि महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टी मायनॉरिटी विभागाचे भिवंडी शहर अध्यक्ष अब्दुल गनी खान यांनी केली आहे. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, महानगरपालिका प्रशासनाने काही महिन्यांपूर्वी शहरात सुरू असलेल्या १८ बेकायदेशीर शाळांची यादी जाहीर केली होती. तरी देखील शहरात बेकायदेशीर शाळा सुरू आहेत. या शाळांमुळे सरकारी शाळा बंद होत आहेत.

या अनधिकृत शाळांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि या शाळा चालवणाऱ्यांवर कठोर आणि दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी आहे. तसेच या अनधिकृत शाळांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उद्धस्त होत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. या शाळांवर कारवाई न झाल्याने अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेतल्याने अनेक विद्यार्थ्यांची फसवणूक होत आहे. शिक्षण विभागाने बेकायदेशीरपणे चालणाऱ्या अर्धा डझनहून अधिक बेकायदेशीर शाळांची नावे यादीत समाविष्ट केलेली नाहीत. त्यामुळे या निवेदनात महापालिकेच्या यादीत समाविष्ट नसलेल्या ६ बेकायदेशीर शाळांची यादी देखील जोडली आहे.

# मांडा पश्चिम परिसरात झाड कोसळल्याने वीजपुरवठा खंडित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : मांडा टिटवाळा पश्चिम येथील माऊली कृपा परिसरात मोठे झाड विजवाहिनीवर कोसळल्यामुळे वीज वितरण यंत्रणेला मोठा फटका बसला आहे. या घटनेत लघुदाब वीजवाहिनीचे तीन पोल पडले असून, वीज लाईनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यासोबतच परिसरातील ट्रान्सफॉर्मरही नादुरुस्त झाला आहे.



या तांत्रिक अडचणीमुळे माऊली कृपा बिल्डिंग, आझाद नगर, संतोषी माता चाळ, एकवीरा कॉलनी, पंढरीनाथ भोईर चाळ व आसपासच्या भागांचा वीजपुरवठा पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. महावितरणच्या मांडा ग्रामीण शाखेचे सहाय्यक अभियंता यांनी कळवले असून, त्यांच्या म्हणण्यानुसार तांत्रिक दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. नागरिकांनी संयम बाळगावा व सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत.

# संत सेवालाल महाराज आणि देवी जगदंबा मंदिर जागेवर पत्री शेडच्या कामाला सुरवात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : मोहने-आंबिवली येथील बंजारा समाजाचे आराध्य दैवत-संत सेवालाल महाराज आणि देवी जगदंबा माता मंदिराच्या जागेवर कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या स्थानिक विकास निधीतून भव्य अशा पत्री शेडच्या कामाचे भूमिपूजन शिवसेना शाखाप्रमुख रोहन कोट यांच्याहस्ते



संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेची पुजा करुन आणि श्रीफळ वाढवून संपन्न झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संत सेवालाल महाराज बंजारा व लमाण समाज तांडा समृद्धी योजनेचे ठाणे जिल्हा अशासकीय सदस्य कैलास तंवर, जय सेवालाल बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक चव्हाण, बंजारा समाज सेवा संस्थेचे ज्येष्ठ संचालक विठ्ठल राठोड, धनराज राठोड, बबलू राठोड, सोमलू राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.




# वीज ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम न भरण्याचे भिवंडी खासदारांचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : सध्या भिवंडी क्षेत्रातील टोरंट पॉवर कंपनी कडून वीज वितरण केल्या जाणाऱ्या वीज ग्राहकांना वीज बिलासोबतच अतिरिक्त सुरक्षा रक्कम भरण्या बाबत पत्र दिले गेले आहे त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. याबाबत नागरिकांनी भिवंडी चे खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे यांच्या कडे तक्रार करताच त्यांनी गंभीर दखल घेत वीज ग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरू नये असे आवाहन त्यांनी सोशल मीडिया निवेदनाद्वारे वीज



ग्राहकांना केले आहे.

कोणत्याही विभागा कडून, किंवा टोरंटच्या अधिकाऱ्यांकडून अनामत रक्कम भरण्यासाठी जबरदस्तीने केल्यास माझ्याशी वैयक्तिक अथवा माझ्या कार्यालयाशी संपर्क



साधावा असे आवाहन खा.म्हात्रे यांनी केले आहे. टोरंट हटाव हे माझ्या लोकसभा निवडणुकीतील आंदोलनात्मक आश्वासन होते.मला त्याचा विसर पडलेला नाही आणि तो लढा सुद्धा थांबलेला अशी माहिती खा.म्हात्रे यांनी दिली.

**याबाबत टोरंट पॉवर कंपनीशी संपर्क साधला असता,त्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ही महावितरणच्या नियमानुसार व महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या पुरवठा संहिता नियम २०२१ च्या अनुषंगाने घेण्याचे निर्देश असल्याची प्रतिक्रिया जनसंपर्क अधिकारी चेतन बदयानी यांनी दिली.**

**वीज कायद्याच्या कलम ४७ नुसार वीज जोडणी घेण्यासाठी ग्राहकांनी सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे बंधनकारक आहे.तर राज्य वीज नियामक आयोगाच्या पुरवठा संहिता नियम २०२१ नुसार,अनामत सुरक्षा रक्कम ही वीज बिल कालावधीच्या सरासरी वीज बिलाच्या दुप्पट असणार आहे. या नियमांतर्गत सरासरी बिल निश्चित करण्यासाठी,गेल्या बारा महिन्यांतील सरासरी वीज बिलाचा विचार केला जातो. ज्या प्रकरणां मध्ये पुरवठा कमी कालावधी साठी झाला आहे,अशा परिस्थितीत कमी कालावधीच्या सरासरी वीज बिलाचा विचार केला जातो.ज्यांचा वीज पुरवठा सुरू आहे अशा ग्राहकांकडून आवश्यक असलेल्या सुरक्षा ठेवीच्या रकमेची कंपनी दरवर्षी फेरगणना करेल असे त्यांनी सांगितले.**

# हिंदी भाषा सक्तीला बळी पडू नका : डोंबिवलीतील शाळांना मनसेचे पत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता/**डोंबिवली** : देशातील इतर राज्यात शाळांमध्ये हिंदी भाषा शक्ती नसताना महाराष्ट्रातच शाळांमध्ये हिंदी भाषा सक्ती का? असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उपस्थित केला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन हिंदी भाषासक्ती नको असे पत्र मनसैनिक मुख्याध्यापकांना देतील असे सांगितले होते. गुरुवारी डोंबिवलीतील शाळांमध्ये मनसे पदाधिकारी व मनसैनिकांनी मुख्याध्यपकांना निवेदन दिले. हिंदी भाषेला बळी पडू नका, सरकारकडून जर आपल्यावर दबाव येत असेल तर मनसेच्या शाखेशी संपर्क साधावा असे आवाहन केले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे त्यांच्या आदेशानुसार आणि मनसे नेते तथा माजी आमदार प्रमोद (राजू) पाटील यांच्या सूचनेनुसार शाळांना निवेदन देताना यावेळी कल्याण जिल्हाअध्यक्ष प्रकाश भोईर, डोंबिवली शहरप्रमुख राहुल कामत,महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना डोंबिवली शहराध्यक्ष मिलिंद म्हात्रे, विधानसभा सचिव उदयजी वेळासकर, कल्याण ग्रामीण विधानसभा सचिव अरुण जांभळे, महिला शहर सचिव कोमल पाटील शहर संघटक प्रतिभा पाटील ,स्मिता भणगे, सुमेधा थत्ते, शहर सचिव संदीप (रमा) म्हात्रे उपशहर अध्यक्ष श्रीकांत वारंगे,प्रेम पाटील, प्रतीक देशपांडे, परेश भोईर, विभाग अध्यक्ष कदम भोईर,रवी गरुड, प्रदीप चौधरी,संजय चव्हाण तसेच उपविभाग अध्यक्ष,शाखा अध्यक्ष, महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.



## घरफोडी प्रकरणी आरोपीला अटक
### ४ लाखाचा मुद्देमाल जप्त



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** रायगड जिल्ह्यातील दादर सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत 2 ते 9 जून 2025 दरम्यान झालेल्या घरफोडी प्रकरणाचा छडा लावत पोलिसांनी आरोपीस अटक करून सुमारे 4 लाख 10 हजार रुपये किमतीचा ऐवज जप्त केला आहे. खारपाडा येथील फिर्यादी सत्यजित सुरेश वाजपेयी यांच्या घराच्या खिडकीतून प्रवेश करून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरली होती.यावरुन भा.दं.वि.कलम 331 (अ), 305 (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलिस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे व उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राह्मणे यांच्या नेतृत्वाखालील पथकातील पोलीस फौजदार ठाकूर, पोलीस हवालदार अतिश पाटील आणि नंदन पाटील यांच्या प्रयत्नांतून आरोपी गुड्डू हरेराम सिंह (वय 19, रा. पकवलिया, उत्तर प्रदेश, सध्या राहणार हसुरामबुवा नेरूळकर यांची वाडी, खारपाडा-पेण) यास अटक करण्यात आली. त्याच्याकडन ₹3,15,000 किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र, ₹90,000 किंमतीचा सोन्याचा नेकलेस, ₹1,000 किंमतीचा नेकलेस, ₹4,200 रोख रक्कम असा एकूण ₹4,10,200 चा माल हस्तगत करण्यात आला.या कारवाईने गुन्ह्यातील 100% ऐवज पोलिसांनी हस्तगत केला आहे. स्थानिक नागरिकांनी पोलींच्या कामाचे कौतुक केले आहे.

# मुरबाड मध्ये मुसळधार पाऊस
## बांदलपाडा -ठुणे मार्गावरील पुल पाण्याखाली!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड दि.१९- (प्रतिनिधी)** मुरबाड तालुक्यात सर्वत्र गेली दोन दिवस मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे.पडत असलेल्या पावसामुळे सर्वच ठिकाणी शेतामध्ये पाणीचपाणी झाले आहे तसेच तालुक्यातील प्रमुख नद्या दुथडी भरून पाण्याने वाहू लागल्या आहेत ठुणे - पाडाळे -मिल्हे या मार्गावर बांदलपाडा ते ठुणे दरम्यान असलेल्या पुलावरून गुरुवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास पाणी गेल्याने या परिसरातील नोकरदार, आजारी माणसे व शाळेय विद्यार्थी विद्यार्थिनी यांना कामावर व शाळेत जाता आले नाही, त्यांनतर सकाळी दहा वाजता पुलावरील पाणी ओसरलं,,गेली पंधरा ते वीस वर्षे येथील ग्रामस्थ नवीन उंच पुलाची मागणी करत आहेत, परंतु

### काळू नदीला पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला!



बांधकाम विभागाचे अधिकारी हे लक्ष देत नाहीत, जोरदार पावसामुळे काळू नदीला पुर आल्याने पारगाव येथील राजमाता वाडीचा (पूर्वीची ठाकूर वाडी) संपर्क तुटला असून विद्यार्थी, नागरिक यांना शासनाने मदत करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. परंतु गुरुवारी दुपारपर्यंत कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नसल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते जगदीश भालके यांनी दिली आहे.जुन ते आक्टोंबर या चार महिन्यांत येथील नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागतो आहे, तरी येत्या वर्षात हे पुलाची उंची वाढविण्यासाठी निधी उपलब्ध करून बांधकाम करण्यात यावे,व येथील नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घ्यावी अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर मुरबाडे यांनी केली आहे.



### टेंभरे बु. ग्रामपंचातीचे
## सुहास केंबारी यांना आदर्श सरपंच पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड :: दिलीप पवार

महाराष्ट्रातील दैनिका मधील अग्रगण्य असणारे दै.पुढारी यांनी 2025 वर्षासाठी आयोजित केलेल्या आदर्श सरपंच सन्मान सोहळयात ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील टेंभरे बु. गावचे तरूण , तडफदार व उच्च शिक्षित सरपंच श्री. सुहास केशव केंबारी यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.रायगड जिल्ह्याच्या वतिने पनवेल येथे हा पुरस्कार सोहळा दि.18 जुन 2025 रोजी पार पडला.राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व रोजगार हमी ,फलोत्पादन मंत्री भरत गोगावले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थितीत होते.मागिल ग्रामपंचायत पंचवार्षिक निवडणुकीत सुहास केंबारी हे थेट सरपंच म्हणून भरघोस मतांनी निवडून आले आहेत. लहानपणा पासूनच समाजसेवेची आवड असलेल्या केंबारी यांनी सरपंच झाल्या नंतर गावातील शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पाणी, विज, रस्ते,गटारे यावर विशेष लक्ष देऊन काम केले.जि.परिषद शाळेकडे लक्ष देऊन शैक्षणिक सुविधा पुरविल्या तसेच नुकताच या गावाला तंटामुक्त पुरस्कार सुद्धा मिळाला आहे. आपल्या शिक्षणाचा तसेच प्रशासनातील ओळख परिचयाचा उपयोग करून त्यांनी गावचा कायपालट केला आहे.याची दखल घेत त्यांना दै. पुढारी आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित केले असल्याने त्यांचे विविध स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

# पडघ्यातील सर्वीस रस्त्यावर खड्डे, शेण, कचऱ्याचे ढीग
## अपघाताची शक्यता ■ नागरीकांचे आरोग्यही धोक्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
:: राजेश दळवी

**पडघा दि. १९** वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील मुंबई नाशिक महामार्गालगत असलेल्या सर्वीस रस्त्यावर खड्डे, शेण, कचऱ्याचे ढीग साचले असुन अपघातासह नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

मुंबई नाशिक महामार्गावरून पडघा गावात येण्यासाठी व गावाबाहेर पडण्यासाठी सर्वीस रस्ता बनवला असुन या रस्त्यावर शेकडो वाहनांची रात्र दिवस वर्दळ असते त्याची दुरुस्ती देखभाल मुंबई नाशीक महामार्गावरील टोल वसुली करणारी कंपनी करीत आहे. पडघा वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या जवळील



सर्वीस रस्त्यावर कित्येक महीन्यांपासुन मोठाले खड्डे पडले असुन ते पावसाच्या पाण्याने भरल्याने रात्रीच्या वेळेस प्रवाशी रिक्षा, दुचाकी अडकुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच हा सर्वीस रस्ता संपूर्ण उखडला असुन अनेक ठिकाणी सखोल भागात पाणी तुंबल्याने वाहनचालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर टोलवसुली करण्यात मग्न असणारी कंपनी काहीच उपाययोजना करीत नसल्याने नागरिकच सुरक्षीततेसाठी खड्डयाभोवती दगडी लाऊन काळजी घेत आहेत.

तसेच पालवी हॉटेसमोरील तबेले धारक सर्वीस रस्त्यालगतच तबेल्यातील शेण टाकत असुन ते शेण रस्त्यावर पसरल्याने दुचाकी घसरून अपघाताचा धोका वाढला आहे तसेच शेरेकर सॉ. मिलजवळ व सुदर्शन नगरच्या पाठीमागील सर्वीस रस्त्यावर कचऱ्याचा ढीग साचला असुन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून विविध प्रकारचा कचरा, घाण टाकली जात असुन हा कचरा पावसाने भिजल्याने कचरा सर्वीस रस्त्यावर पसरून उग्र दुर्गंधी येत असल्याने येथुन प्रवास करणाऱ्या व जवळच असलेल्या नागरी वस्तीतील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले. आल्याचे विदारक चित्र येथे पहावयास मिळत आहे तसेच हा रस्ता स्वच्छ करुन लवकर दुरुस्त करावा अशी मागणी नागरिकांकडुन होत आहे

# ज्ञानेश्वर मुरबाडे यांच्याकडून
## गरीब व गरजू विद्यार्थ्यांना छत्री वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील ठुणे गावचे सुपुत्र तथा सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर मुरबाडे यांनी १९जून २०२५रोजी यांजकडून ज्ञानसाधना विद्यालय माजगाव येथे गरीब गरजू विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी छत्र्या वाटप करण्यात आल्या. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक



तसेच शाळेय विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता







# कोशिंबडे येथे घर कोसळले एकजण किरकोळ जखमी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण** : पिवळी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे कोशिंबडे येथील एक कच्चे असलेले राहते घर कोसळले या घडलेल्या घटनेत घर मालक किरकोळ जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले आहे.

वासिंद पासून दहा ते बारा किमी अंतरावर पिवळी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे कोशिंबडे येथील कातकरी वस्ती मध्ये राहणाऱ्या बारकू हरी भोईर यांचे आज ( दि. 19 जून) सायंकाळी सहाच्या सुमारास राहते घर कोसळून पडले. यामध्ये संपूर्ण घर पडून नुकसान झाले आहे तर घरातील बारकू भोईर हे जखमी झाले त्यांना उपचारासाठी पाच्छापुर येथे रुग्णालयात दाखल केले अशी माहिती ग्रामपंचायत हद्दीतील सावरोली येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील यांनी दिली.

सदर, घटनेची माहिती मिळताच येथील सरपंच प्रणवी बुरुडे, उपसरपंच अविनाश विशे व ग्रामस्थ यांनी येथे भेट देऊन यासंदर्भात मदतकार्य केले असून सदर बारकू भोईर यांना प्राथमिक उपचार करून घरी आणले आहे तर त्यांची पत्नी यांना कुठलीही इजा झाली नाही सध्या या कुटुंबायांची शेजारच्या घरात राहण्याची व्यवस्था केली असून याबाबत ग्रामसेवक, तलाठी व मंडळ अधिकारी यांनी माहिती दिली असल्याचे उपसरपंच अविनाश विशे यांनी म्हटले. दरम्यान, सध्या पावसाचा जोर असून अनेक ठिकाणी झाडं पडणे, घरांची पडझड व काही ठिकाणी पाणी साचून जनजीवन विस्कळित होऊन इतर नुकसानीच्या घटना घडत आहेत.

# ‘जीवन शिक्षण‘ व ‘शिक्षण संक्रमण‘
## या मासिकांत सुनील म्हसकर यांचा लेख प्रसिद्ध...

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : शेतकरी उन्नती मंडळ काल्हेर संचालित सिताराम रामा पाटील विद्यालय व रामदास दुंदा केणे कनिष्ठ महाविद्यालय आमणे, ता. भिवंडी, जिल्हा - ठाणे येथील सहशिक्षक श्री. सुनील मारुती म्हसकर यांच्या 'चला वाचू आनंदे...' ह्या लेखाला "जीवन शिक्षण" व "शिक्षण संक्रमण" माहे एप्रिल २०२५ च्या मासिकांत प्रसिद्धी मिळाली आहे. साहित्यिक सुनील म्हसकर हे 'शारदासुत' म्हणून सर्वत्र सुप्रसिद्ध आहेत. ते एक हाडाचे उपक्रमशील शिक्षक असून उत्तम कवी, गायक, लेखक, प्रभावी व्याख्याते, मार्गदर्शक व समुपदेशक आणि व्यासंगी असे वाचक आहेत. 'चला वाचू आनंदे...' या लेखात त्यांनी वाचन म्हणजे काय, वाचनाचे प्रकार, विविध पुस्तकांचे वाचन का व कसे महत्त्वाचे आहे, आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि सुखी व आनंदी जीवनासाठी वाचन कसे फायद्याचे ठरते, तसेच माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात आपण वाचन संस्कृती रुजविण्यासाठी काय काय उपाययोजना केल्या पाहिजेत इत्यादी मुद्द्यांवर प्रकाशझोत टाकला आहे.

शिक्षक, पालक व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात मार्गदर्शक म्हणून १९ व्या शतकात सुरु झालेले आणि शिक्षण व शिक्षणासाठीच वाहिलेले तसेच १६५ वर्षाची गौरवशाली व वैभवशाली परंपरा असलेले महाराष्ट्रातील पहिले मासिक म्हणजे "जीवन शिक्षण". सध्या महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण विभागाचे मुखपत्र म्हणून "जीवन शिक्षण" हे मासिक ओळखले जाते. या मासिकाचे प्रकाशन राज्यातील शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी कार्यरत असणाऱ्या व राज्य शासनाची एक प्रमुख शिखर संस्था म्हणून काम पाहणाऱ्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या प्रसारमाध्यम विभागामार्फत केले जाते. शासनाची ध्येय-धोरणे व प्रत्यक्ष कृती-कार्यक्रम आणि अपेक्षित शालेय स्तरावरील अंमलबजावणी व परिणाम यांच्यातील दुवा म्हणून "जीवन शिक्षण" हे मासिक कार्यरत आहे. जीवन शिक्षण हे मासिक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या जीवन कौशल्यांवर आधारित आहे. हे



मासिक शिक्षकांना त्यांच्या अध्यापन प्रक्रियेत जीवन कौशल्यांचा समावेश कसा करावा याबाबत मार्गदर्शन करते. शिक्षणक्षेत्रातील नवनवीन तंत्रे, पद्धती, विचार, कल्पना, संशोधने इत्यादी बाबत शिक्षक व पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी यांना अद्ययावत माहिती पुरवून त्यांची क्षमता वृद्धी केली जाते. राज्यातील जिल्हा परिषदांच्या जवळपास ६०,००० हून अधिक शाळांना या मासिकाचे दरमहा मोफत वितरण करण्यात येते. याच सोबत वर्गणीदार व देणगीदार यांना हा अंक पोस्टामार्फत सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिला जातो. तर "शिक्षण संक्रमण" हे शालेय शिक्षण विभागाच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे एक शैक्षणिक मासिक आहे. या मासिकात शिक्षण क्षेत्रातील नवीन विचार, शैक्षणिक उपक्रम, दिनविशेष, मूल्यमापन पद्धती, शैक्षणिक तत्त्वज्ञान, अभ्यासक्रमातील बदल, अध्यापन पद्धती, परीक्षा पद्धती, आणि शासकीय परिपत्रके यांसारख्या विषयांवर लेख प्रकाशित केले जातात. शिक्षण संक्रमण मासिकाचा मुख्य उद्देश शिक्षकांसाठी अद्ययावत ज्ञान देणे तसेच शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलांची माहिती देणे आहे.

दरम्यान, मासिकांची रचना, नाविन्यपूर्णता आणि आकर्षक मांडणी इत्यादी गुणवैशिष्ट्यामुळे राज्यभरातील अधिकारी व शिक्षक वर्गाचे आवडत्या असणाऱ्या "जीवन शिक्षण" व "शिक्षण संक्रमण" या नामांकित अशा दोन्ही मासिकांत सुनील म्हसकर सर यांचा लेख प्रसिद्ध झाल्याने त्यांच्या लेखनाचे संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण क्षेत्रातील अनेक शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख,शिक्षणतज्ज्ञ, संस्थाचालक, अधिकारी वर्ग तसेच साहित्यिक व चोखंदळ वाचक अशा अनेकांकडून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

# टिटवाळ्यातील चाळींमध्ये पुन्हा शिरले नाल्याचे पाणी
## संभाव्य नागरी आरोग्य प्रश्न ऐरणीवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** :गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे टिटवाळा पश्चिमेतील आझाद नगर भागात पुन्हा एकदा गटाराचे दुर्गंधीयुत पाणी शिरुन कहर सुरू झाला आहे. ड्रेनेज यंत्रणेचा अभाव, अनधिकृत चाळींच्या वाढत्या संख्या, आणि प्रशासनाचा सावळा गोंधळ कारभार यामुळे चाळीतील नागरिकांच्या घरात थेट गटाराचे सांडपाणी मिश्रित पाणी शिरत असून दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे संभाव्य नागरी आरोग्याचा प्रश्न उभा ठाकला आहे. ड्रेनेज लाईनचाच अभाव असलेल्या या भागात दरवर्षी पावसाळ्यात हीच समस्या उद्भवत असून, यंदा देखील गटाराचे सांडपाणी थेट घरात घुसल्याने नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे.



याबाबत मलनिसारण विभागचे कार्यकारी अभियंता घनश्याम नवागुंळ यांनी सांगितले की काही ठिकाणी ड्रेनेजलाईनवर लोकांनी चाळी बांधलेल्या आहेत त्यामुळे सफाईसाठी अडचणी येत आहे. येथील अनधिकृत बांधकाम चाळी हटवण्याबाबत सहाय्यक आयुक्तांना रिपोर्ट केलेला आहे. तसेच सध्या तुंबलेल्या ड्रेनेज लाईनच्या सफाईचे काम असणारा जुना ठेका रद्द केला असून नव्याने कामचा ठेक्यासाठी निविदा देण्यात आलेल्या आहेत. याबाबतच्या काही टेक्निकल बाबींवर अभ्यास चालू असून येत्या आठवड्याभरात ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी अधिक कार्यक्षमता असलेल्या गाड्या सेवेत रुजू होतील असे सांगण्यात आले. तर आज टिटवाळा येथे सावरकर नगर , नांदप रोड , सिद्धिविनायक कॉलनी, एक नव्याने गाडी काम कारण्यासाठी पाठवल्याचे त्यांनी सांगितले तर सध्या उपलब्ध असलेली यंत्रणा ही अपुरी असून ती अधिक चांगल्या पद्धतीने कार्यक्षम करण्याचे आमचे प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी सांगितले .आझाद नगरसह टिटवाळ्याच्या अनेक भागांत गटार सफाई, मलनिसारण यंत्रणा आणि पावसाळी पूर्वतयारीसंबंधीची दिरंगाई नागरिकांच्या जीवावर बेतू शकते. प्रशासकीय सावळा गोंधळ कारभाराचे सर्वोत्तम उदाहरण असल्याची टिका यानिमित्ताने सर्वसामान्य करदात्या नागरिकांकडून केली जात आहे .

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024